# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
मेल : estt6mjp@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२२/प्र.क्र.५४/आ-६ दिनांक :- १३ /०७/२०२३.

**म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना उप विभागीय अधिकारी (स्थापत्य) या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदांवर तात्पुरती पदोन्नती.**

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ अ भाग-१/१६-ब, दिनांक २/११/२०१७ अन्वये असे कळविले आहे की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५/५/२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे.

२. मा.उच्च न्यायालयाने दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली होती. दिनांक १८/१०/२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नती आरक्षण देऊन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७/१०/२०१७ रोजी संपुष्टात आला आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दिनांक ३०/१०/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही. अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत देखील कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दिनांक २५/५/२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३/११/२०१७ रोजी होणाऱ्या सुनावणीपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी तसेच पदोन्नती संदर्भातील कोणतेही आदेश निर्गमित होणार नाही.

३. त्यानंतर शासन पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ अन्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

४. राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णया विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वर अद्याप पर्यंत अंतिम निर्णय

२/-

Shelar
AE-2
upload on website

2023-31-50186
19-07-2023

झालेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत पदोन्नतीच्या कोटयातील बिंदुनामावली तपासून शासन पत्र दिनांक २९/१२/२०१७ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार, केवळ खुल्या प्रवर्गातील पदे शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत भरणे अपेक्षित आहे.

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१ अन्वये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक २०/४/२०२१ हा अधिक्रमित करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे शासन निर्देश आहेत.

६. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले खालील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७/५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन खालील अभियंता यांना रुपये S-२० : ५६१००-१७७५००/- या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देऊन खालील तक्त्यातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्ये.सू. क्र. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १९५ | श्री.जी.आर. बोर्डे | मुख्य अभियंता कार्यालय, म.जी.प्रा. प्रा.विभाग, औरंगाबाद | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, औरंगाबाद, जि.प., औरंगाबाद | रिक्त पदी |
| २ | १९६ | श्री. ए.डी.भोपळे | म.जी.प्रा. उपविभाग, इस्लामपुर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.१, कराड | रिक्त पदी |
| ३ | १९७ | श्री.ए.व्ही.लोहारे | म.जी.प्रा. उपविभाग, संगमनर | म.जी.प्रा. उपविभाग, कोपरगांव | रिक्त पदी |
| ४ | १९८ | श्री.एस.के.झेंडे | म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, सातारा | म.जी.प्रा. विभाग, वाशिम | रिक्त पदी |
| ५ | २०३ | श्री.एस.बी.लाड | म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, सातारा | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, खंडाळा, जि.प., सातारा | पा पु व स्व वि शा नि दि २८ १२ २२ अन्वय नवनिर्मित उपविभाग |

| अ. क्र. | ज्ये.सू. क्र. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६ | २०४ | श्री.अेन.अेन.गायकवाड | म.जी.प्रा.ज.व्य. विभाग, सातारा | म.जी.प्रा. ज.व्य. उपविभाग क्र.३, अंबरनाथ | रिक्त पदी |
| ७ | २०५ | श्री.पी.एन.दांडगे | मु.अ.कार्यालय, औरंगाबाद | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, परतुर | रिक्त पदी |
| ८ | २०६ | श्री.एम.एल.रोकडे | म.जी.प्रा.विभाग क्र.१, पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जुन्नर, जि.प., पुणे | पा.पु.व स्व. वि. शा.नि. दि.२८.१२.२२ अन्वये नवनिर्मित उपविभाग |
| ९ | २०७ | श्री.एस.एस.सरोदे | म.जी.प्रा. उपविभाग क्र.१, औरंगाबाद | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, औरंगाबाद | रिक्त पदी |
| १० | २११ | श्री.ओ.एल.बोंद्रे | म.जी.प्रा. उपविभाग, साकोली | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, तुमसर, जि.प., भंडारा | रिक्त पदी |
| ११ | २५९ | श्री.राजकुमार विठ्ठल परिट (अपंग) | म.जी.प्रा. उपविभाग, इंचलकरजी | म.जी.प्रा. विभाग, कोल्हापुर | रिक्त पदी |

७. वरील विवरणपत्रातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) या संवर्गात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेनुसार केवळ उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

अ) वरील अभियंता यांना उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) या पदावर दिलेली तात्पुरती पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहेत.

ब) भविष्यात म.जी.प्रा.ची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसुचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क) उपरोक्त पदोन्नत उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) यांच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

ड) संबंधीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांनी उप विभागीय अधिकारी (स्थापत्य) पदी दिलेली पदोन्नती स्वीकृत न केल्यास, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन/ १९९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०.७.२००१ अन्वये संबंधीतास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा म्हणजेच उप विभागीय अधिकारी पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला असेल तर सदर लाभ काढून घेण्यात येईल. या अनुषंगाने पदोन्नती स्वीकृत न करणारे कनिष्ठ अभियंता यांचे प्रकरणी संबंधीत कार्यालयाने उचित कार्यवाही करावी.

इ) पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे, तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास सादर करावा. पदोन्नत अधिकाऱ्यांनी अनधिकृत रजेवर जावू नये. त्यांचे लक्ष्य सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सुचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

८. पदोन्नत उप विभागीय अधिकारी यांची पदस्थापना प्रशासकीय कारणास्तव असल्याने, त्यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

DDS 13/7/23

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत : माहितीस्तव.

- मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा. अध्यक्ष यांचे खाजगी सचिव.
- मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा. उपाध्यक्ष यांचे खाजगी सचिव.
- मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
- मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/सातारा/औरंगाबाद/भंडारा
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती /नागपूर.
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., मुख्यालय, मुंबई/गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडको भवन/म.नि.स.स. कक्ष, मुंबई
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/अहमदनगर/जळगांव/औरंगाबाद/नांदेड/लातूर/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपुर
- कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग, ------------------
- कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.विभाग, जि.प., पुणे/सातारा/औरंगाबाद/भंडारा
- उप अभियंता, आय.टी. सेल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- कक्ष अधिकारी, आस्था १ (उविअ)/आस्था-२ (विचो), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- पदोन्नत उप विभागीय अधिकारी (स्थापत्य)
- कार्यालयीन आदेश धारिका.